महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्र. ३७४(२)/ विदयुत/२०२१/१९** **दिनांक:- १५जून, २०२३**

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय :- महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा-२०२१ अंतिम निकाल.**

**संदर्भ :- १) जाहिरात क्रमांक १७/२०२२ व अधिसूचना क्रमांक ६५/२०२२**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक ३० एप्रिल ,२०२२ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा-२०२१ चा ४८ पदांचा अंतिम निकाल दिनांक १५ जून, २०२३ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

२. सदर परीक्षेमध्ये अहमदनगर जिल्हयातील शिंदे संकेत अनजाबापू बैठक क्रमांक NS001035 हे राज्यातून व मागासवर्गवारीतून प्रथम आले आहेत व सांगली जिल्हयातील खाडे प्रियांका रघुनाथ बैठक क्रमांक PN001079 या महिला वर्गवारीतून राज्यात प्रथम आल्या आहेत.

३. उपरोक्त निकालात नमूद केलेल्या सर्व उमेदवारांच्या शिफारशी त्यांनी प्रस्तुत परीक्षेच्या अर्जात नमूद केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रावरून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून शासनाकडे करण्यात येत आहे. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास, अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्राची पूर्तता न केल्यास तसेच शासनस्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासतांना व अन्य कारणामुळे अपात्र ठरणा-या संबधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

४. प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या व अन्य मुद्दयांसंदर्भात विविध मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्याय निर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

५. सदर शिफारस यादीनुसार आरक्षित पदांवर दिव्यांग/ अनाथ/खेळाडू/ मागास उमेदवारांची शिफारस विहित प्राधिकरणाकडून तपासणी करण्याच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

६. प्रस्तुत परीक्षेत मुलाखतीस उपस्थित असलेल्या व अपात्र न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके त्यांच्या प्रोफाईलमध्ये पाठविल्याच्या दिनांकापासून दहा दिवसात आयोगाकडे ऑनलाईन पद्धतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.

**ठिकाण- नवी मुंबई**

**उपसचिव, परीक्षा-(राजपत्रित)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,**